१) माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम ५ (१).
२) आदेश क्र.नासुके/१/कावि/७०५/२०१३ दि.०६/११/२०१३.
३) आदेश क्र.नासुके/१/कावि/२५८/२०१६ दि.०७/०७/२०१६.
४) मा.आयुक्त सो. यांनी बांधकाम विभागाकडील दि.०२/०५/२०१७ रोजीचा मान्य केलेला प्रस्ताव.

---

ISO 9001 : 2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

माहितीचा
अधिकार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
नागरी सुविधा केंद्र.
क्र.नासुके/१/कावि/९६० /२०१७
दिनांक : २० /०५/२०१७

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५**
**जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित करणेबाबत...**
**(बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग)**

**आदेश**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५ (१) व १९ (१) मधील तरतूदीनुसार वाचले क्र.२ च्या आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाच्या विविध विभागांसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित करण्यात आलेले आहेत. तसेच वाचले क्र.३ अन्वये बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागासाठी उपअभियंता यांना जनमाहिती अधिकारी व उपशहर अभियांता यांना प्रथम अपिलिय अधिकारी म्हणून पदनिर्देशित करणेत आले आहे.

बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडील विविध मंजूर नकाशे, पूर्णत्वाचे दाखले, बांधकाम मंजूर नस्तीमधील आवश्यक अभिलेख मिळणेसाठी मोठया प्रमाणावर माहिती अधिकारांतर्गत अर्ज प्रप्त होत असलेने व येणाऱ्या अर्जांवर जलद गतीने कार्यवाही होणेचे दृष्टीने वाचले क्र.४ चे बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाच्या कार्यालयीन प्रस्तावान्वये बांधकाम विभागाने प्रथम अपिलीय अधिकारी यामध्ये बदल सुचविलेले आहेत. त्यानुसार संबंधित उपशहर अभियंता यांचे ऐवजी संबंधित कार्यक्षेत्राचे कार्यकारी अभियंता अ,ब,क,ड,ई,फ यांना त्या त्या प्रभागाचे प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून पदनिर्देशित करणेबाबत कळविले आहे.

सबब, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडील माहिती अधिकार विषयक कामकाज जलदगतीने पार पाडावे व नागरिकांना माहिती शिघ्रतेने उपलब्ध व्हावी या उद्देशासाठी आणि अधिनियमातील तरतूदी या बाबी विचारात घेऊन, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, या आदेशान्वये संबंधित उपअभियंता (अ,ब) (क,ड) व (इ,फ) यांना यापूर्वी प्रमाणेच जन माहिती अधिकारी म्हणून कायम ठेवणेस व उपशहर अभियंता यांचे ऐवजी कार्यकारी अभियंता (अ,ब) (क,ड) व (इ,फ) यांना प्रथम अपिलिय अधिकारी म्हणून पदनिर्देशित करणेस मान्यता देत आहे.

संबंधित अधिकारी यांची प्रशासकीय बदली झाल्यास / पद रिक्त असल्यास, बदली झालेल्या किंवा अतिरिक्त पदभार सोपविलेल्या अधिकारी / कर्मचा-यांनी त्या पदास पदनिर्देशित केल्याप्रमाणे कामकाज करावे. कामकाज बदलामुळे किंवा अन्य कारणांमुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे पद रिक्त राहिल्यास विभागप्रमुख, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग यांनी माहितीच्या अधिकाराची व्यवस्थित अंमलबजावणी होण्यासाठी उपाययोजना व कार्यवाही आपल्या स्तरावर करावी.

आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

विभागप्रमुख / संबंधित अधिकारी,
मुख्य कार्यालय बांधकाम नियंत्रण विभाग,
अ,ब,क,ड,ई,फ क्षेत्रीय कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत,

माहिती व तंत्रज्ञान विभाग.
२/- प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने मनपा वेबपोर्टलवरील माहिती अद्ययावत करावी.

प्रशासन अधिकारी,
नागरी सुविधा केंद्र
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.